यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231479

परीक्षा विभाग / Examination Division

जावक क्र. : परीक्षा-2/MBA/2023/688/146 दिनांक : 09.08.2023

## एम. बी. ए. शिक्षणक्रम 2023-24 प्रवेशाबाबत (AICTE Approved)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष 2023-024 करिता एम. बी. ए. शिक्षणक्रमाच्या प्रथम वर्षाचे ऑनलाईन प्रवेश दिनांक 10 ऑगस्ट 2023 पासून सुरू होत आहेत.

एम. बी. ए. शिक्षणक्रमास प्रवेश घेण्यासाठी प्रथम प्रवेश परीक्षा (Entrance Examination) देणे बंधनकारक असून या प्रवेश परीक्षा ऑनलाईन पद्धतीनेच घेण्यात येतात. या प्रवेश परीक्षेची लिंक दिनांक 10 ऑगस्ट 2023 ते दिनांक 18 ऑगस्ट 2023 या कालावधीत उपलब्ध आहे.

प्रवेश परीक्षा पात्र असणाऱ्या आणि एम. बी. ए. शिक्षणक्रम प्रवेशासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या विद्यार्थ्यांना एम. बी. ए. शिक्षणक्रमाच्या प्रथम वर्षास प्रवेश देण्यात येतो. प्रथम वर्षाचे प्रवेश दिनांक 31 ऑगस्ट 2023 पर्यंत सुरू राहतील.

**प्रवेश परीक्षा देणाऱ्या उमेदवारांनी प्रथम खालील सूचनांचे अवलोकन करावे —**

(१) इच्छुक उमेदवारांनी विद्यापीठाच्या पोर्टलवर (ycmou.digitaluniversity.ac) ऑनलाईन प्रवेश परीक्षा अर्ज व परीक्षा शुल्क रू. 600/- भरावे.

(२) प्रवेश परीक्षेसाठी नोंदणी केल्यानंतर उमेदवारास सराव परीक्षा (Demo/Mock Test) उपलब्ध करून देण्यात येईल. त्यानंतर मुख्य प्रवेश परीक्षा (Main Entrance Test) देता येईल.

(३) प्रवेश परीक्षेत पात्र झालेल्या उमेदवारांनी विद्यापीठ पोर्टलच्या होमपेजवर उजव्या बाजूस वर असलेल्या ऑनलाईन प्रवेशाच्या चौकोनावर क्लिक करून पुढे जावे व प्रवेश घ्यावा.

(४) ऑनलाईन प्रवेश अर्ज भरताना शिक्षणक्रम आणि अभ्यासकेंद्र तसेच विषयांची निवड करून प्रथम वर्षाचे प्रवेश शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे आहे.

(५) प्रथम वर्ष प्रवेश अर्जाची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर मुख्यालयातील नोंदणी कक्षाशी संपर्क साधून आपली पात्रता तपासून घ्यावी (दूरध्वनी क्र. 0253-223058). त्यानंतरच प्रथम वर्षाचा प्रवेश निश्चित झाला असे समजले जाईल.

(६) प्रवेश परीक्षेत पात्र नसलेल्या उमेदवारांना पुन्हा प्रवेश परीक्षेसाठी नव्याने नोंदणी करून पात्र होण्याचा प्रयत्न करता येईल.

(७) प्रवेश परीक्षेतील पात्रता म्हणजे प्रवेश पात्रता नाही. एम. बी. ए. शिक्षणक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशाचे निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना प्रथम वर्षासाठी पात्र समजले जाईल. उमेदवारांनी प्रवेश परीक्षा देण्याअगोदर माहितीपुस्तिकेतील संपूर्ण माहिती अवगत करून घ्यावयाची आहे.

उपकुलसचिव
परीक्षा कक्ष २

परीक्षा नियंत्रक

YASHWANTRAO CHAVAN MAHARASHTRA OPEN UNIVERSITY
ज्ञानगंगा घरोघरी
NASHIK

MBA Admission Start👆